Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- IV APRIL 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# 'लोकशाही विषयी' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**प्रा.डॉ. आण्णासाहेब हारदारे**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.
ई –मेल : nnasohardare@rediffmail.com

## प्रस्तावना

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ, तत्वज्ञ, समाजसुधारक, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, दलित बौध्द चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौध्द धर्माचे पुर्नरुज्जीवक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे, भारतीय संविधानाचे निर्माते आणि समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा गुरुमंत्र देणारे असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'लोकशाही' चिंतनाचा थोडक्यात आढावा:

## संशोधन विषयाची उद्दिष्टे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही चिंतन या विषयाचे अध्ययनामुळे पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत :

१. भारतीय लोकशाहीचा अर्थ व स्वरुप अभ्यासणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चिंतनाचा अभ्यास करणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयी विचारांचा अभ्यास करणे.
४. सध्यकालीन लोकशाहीचे स्वरुप अभ्यासणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पध्दतीचा अवलंब करुन संशोधन नियमाशी संबंधित द्वितीय स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संदर्भ, ग्रंथ, मासिके, विशेषांक, साप्ताहिक इत्यादी आधारे शोधप्रबंध तयार केला आहे.

## विषय विवेचन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही हा विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वास्तवाच्या मुशीतून तो तावून सलाखुन निघाला होता. त्यांना केवळ भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढयापुरतेच त्यांचे राजकीय ध्येय सीमित नव्हते तर जगातील लोकशाहीवादी राष्ट्रांशी सहकार्य करुन आपल्या देशाने लोकशाही मुल्यांचे संरक्षण करावे अशी त्यांची इच्छा होती. अन्याय, अत्याचार, जुलूम, सामाजिक विषमता, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासनव्यवस्था कोणती असावी याबाबत त्यांचे चिंतन आयुष्यभर चालले. शेवटी या देशातील सामाजिक संबंधाची फेररचना करणारी, सामान्य माणसाच्या व्यक्तीगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी लोकशाही जीवनमार्गाचा त्यांनी स्विकार केला. लोकशाही म्हणजे सहजीवन.

लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात अशी त्यांची धारणा होती. भारतासारख्या भिन्न लोकसमूहाच्या ठायी सहजीवनाची भावना निर्माण करणे हा विचार आंबेडकरांच्या लोकशाही चिंतनाचा केंद्रबिंदू होता.

उदारमतवादी लोकशाहीचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. भारतात लोकशाही शासन व्यवस्थेच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करता येईल असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते लोकशाही हा केवळ एक शासन प्रकार नसून ती जीवनपध्दती आहे. ती सर्वांना एकत्र सहकार्याने राहण्याची व आपले विविध जीवनाभुव संज्ञापित करण्याची व्यवस्था आहे. लोकशाही ही एक शासनाची अशी एक पध्दत आहे की ज्याद्वारे लोकांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात क्रांतीकारी बदल रक्तपात न करता घडवून आणता येतात. यावरुन आपल्या लक्षात येते की, शासन व्यवहारीसाठीच लोकशाहीची आवश्यकता नाही तर समाज बदलण्याचे सामर्थ्य लोकशाहीत आहे असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही कल्पनेसाठी नैसर्गिक अधिकार, हक्क कायदयाचे अधिराज्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही गतिमान तत्वे आहेत. अब्राहम लिंकन यांच्या व्याख्याचे पुढे जाऊन त्यांनी स्वत: यापेक्षा अधिक प्रभावी व्याख्या स्पष्ट केली. ते लिहितात, ''लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात बदल व तो ही रक्तविरहीत मार्गाने घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय.''

**राजकीय लोकशाही स्थापनेसाठी सामाजिक लोकशाही पूर्वअट**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील विविध देशातील लोकशाही राष्ट्रांच्या लोकशाही अपयशाचे कारण जर सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता असेल तर प्रथम प्रस्थापित विषमता नष्ट करुन समता स्थापन करणे हे लोकशाही यशस्वी करण्यासाठी व टिकविण्यासाठी पूर्वअट आहे. समता हा लोकशाहीचा मूलाधार आहे. त्यांना समाज बदलण्याचे सामर्थ्य लोकशाही कल्पनेत दिसून येतो. राजकीय लोकशाहीत फक्त घटनात्मक हक्क मिळाल्याने लोकशाहीचा पाया तयार होत नसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, राजकीय लोकशाहीत पुढील चार तत्वे महत्वाची आहेत. त्यातूनच राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर होईल. त्यामध्ये पहिले व्यक्तीचे हित व स्वातंत्र्य हेच अंतिम साध्य आहे. दुसरे व्यक्तीस काही अविभाज्य व अदेय असे हक्क आहेत व त्यांची राज्यसंस्थेने हमी घेतली पाहिजे. तिसरे तत्व म्हणजे कोणतीही बाब प्राप्त करण्यासाठी व्यक्तीस आपल्या घटनात्मक हक्कांचा त्याग करण्यास बाध्य केले जाऊ नये आणि चौथी राज्यसंस्थेने कोणत्याही खाजगी व्यक्तीला नागरिकांवर शासन करण्याचा अधिकार देऊ नये. या चतु:सूत्रीच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तीचे स्वांतत्र्य, राज्यघटनेतील हक्क आणि त्या हक्कांचा, अधिकारांचा उपभोग घेण्यासाठी कशा प्रकारची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती असली पाहिजे यांचे निर्देशन केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतात बहिर्गत राजकीय लोकशाहीचा डोलारा अपेक्षित नव्हता तर अंतर्गत सामाजिक लोकशाहीची अपेक्षा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्रत्येक देशात एक सत्ताधारी वर्ग असतो. त्याच्याच हाती स्वातंत्र्योत्तर काळातही सत्ता जाणे स्वाभाविक असले तरी लोकशाहीच्या मुख्य तत्वाशी ते विसंगत असते. लोकशाही व स्वराज्य खऱ्या स्वरुपात प्रकट व्हायचे असेल तर सत्तेचा ज्यांना कधी स्पर्श झाला नाही अशा समाजातील खितपत पडलेल्या पददलित वर्गाला सत्ता प्राप्त होणे हीच खरी लोकशाही असते. भारतात लोकशाही संस्कृतीचा अंगिकार

करावयचा असेल तर पददलित व्यक्तींना सुखी, स्वास्थ्यपूर्ण व निवांत जीवनाची हमी मिळणे आवश्यक आहे. कारण लोकशाही हे शेवटी एक सामाजिक संघटन आहे. लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीच्या 'तळमजल्याचा नकाशा' म्हणजे ग्राऊंड फ्लॅनची संकल्पना मांडली. त्यामध्ये त्यांनी मानवी हक्क, व्यक्तीची प्रतिष्ठा, राजकीय स्वांतत्र्य, सामाजिक विकास इत्यादी लोकशाहीचे आदर्श सामाजिक लोकशाहीत प्रवर्तित होणार नाहीत तोपर्यंत लोकशाहीचा इमला पाया नसलेल्या इमारतीप्रमाणे कोसळून पडेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. राजकारणात व्यक्ती किंवा विभूतीपूजा म्हणजे अध:पतनाचा मार्ग असतो. परिणामी त्यामुळे हुकूमशाही प्रवृत्ती वाढते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. श्रेष्ठ माणसाबद्दल कृतज्ञता असणे यात काहीच गैर नाही पण याच्या आडून स्वातंत्र्य समता व बंधुता या तिन्ही तत्वातील एखादे जरी तत्व गळाले तरी लोकशाहीचा हेतू असफल होईल असा इशारा त्यांनी दिला.

लोकशाहीमध्ये 'एक व्यक्ती : एक मत' यापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ''एक मत एक मुल्य'' हे तत्व अधिक स्विकारणीय वाटते. सामाजिक आणि राजकीय संबंधामध्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील अंगभूत मूल्य या तत्त्वाच्या मुळाशी आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जनतेच्या सर्वांगीण आर्थिक, सामाजिक, विकासाचे रहस्य आढळते. उपासपोटी माणूस, त्याला कधीच कुणाकडून सहानुभूति, प्रेम वा जीवन हेतूचे आदान — प्रदान लाभले नाही किंवा त्याचे समाधान झाले नाही. त्याला पाच वर्षांनी एकदा दिले जाणारे मत कवडी किंमतीचे वाटणे स्वाभाविक आहे व तो मतदान करु शकणार नाही. एक मत, एक मूल्य अशा लोकशाहीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दोन गोष्टींची आवश्यकता प्रतिवादीत केली. पहिली सहसंबंधाबद्दल समन्सकता, सन्मान आणि समभाव आणि दुसरी ताठर अशा सामाजिक बंधनापासून मुक्त अशी सामाजिक रचना, निसर्गनिर्मित विषमता ही लोकशाहीच्या आड येत नाही पण मानवनिर्मित विषमता माणसाला माणूस म्हणून नाकारते त्यामुळे फक्त मताच्या हक्काने परिवर्तन होणार नाही. सर्वांना 'समान दर्जा' हा यशस्वी लोकशाहीचा मुलमंत्र आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संसदीय लोकशाहीवर विशेष भर होता. त्यांच्या मते संसदीय शासन पध्दती हीच भारतीय व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भयता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकते. सहकार्य, शिस्त व समर्पणादी गुणांचा विकास करु शकते. उच्चतर प्रतीचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील सचोटी उद्यम व धारिष्टय इत्यादींचा परीपोष याच पध्दतीत होतो असे त्यांचे मत होते. संसदीय लोकशाहीच मानवी जीवनाशी प्रवाही स्वरुपाची असल्याने प्रत्येक व्यक्तीला आपल्या मुक्तीचा मार्ग या पध्दतीत दिसतो. कारण रक्तपात न घडवता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरुपात बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त तिलाच अवगत असतो आणि विवादय मुद्दयासंबंधीचे निर्णय मनमोकळया चर्चेअंती व सर्वांच्या बहूमताने घेण्याची तरतूद फक्त संसदीय पध्दतीमध्येच आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. शांततापूर्ण मार्गांनी सत्तांतर, नियतकालिन मुक्त व न्याय निवडणूका हा संसदीय लोकशाहीचा कणाच आहे असे त्यांचे मत होते. संसदीय शासन पध्दतीत निवडणूका या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अहिंसक, घटनात्मक व शांततापूर्ण परिवर्तनाचा मार्ग वाटतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फक्त संसदीय लोकशाही एवढेच नाही तर लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्ष आणि विरोधी वृत्तपत्रे अतिमोलाची वाटत होती. मुक्त व न्याय

निवडणूकाबरोबरच समर्थ सत्ताधारी पक्षाइतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही व मन:पूत वर्तनापासून रोखण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्षच करु शकतो. नियतकालीन मुक्त व न्याय निवडणूका हा लोकशाहीचा कणाच आहे पण सामान्य लोकांना सरकारच्या दैनंदिन कारभारावर टिका करता आली पाहिजे. सरकारचे धोरण सतत ऐरणीवर आले पाहिजे, मतदारांना विशिष्ट कालावधीनंतर सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्याची संधी देण्यात आली पाहिजे. लोकांनी उघड टिका करताना संसदीय, संयत भाषेत व सुसंस्कृत असली पाहिजे असे त्यांचे मत होते. राजकीय यशापयशासंबंधी खिलाडू वृत्ती प्रत्येक पक्षात आवश्यक आहे. पण भारतात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. प्रत्येक राजकीय पक्षाने संसदेतील आपले बहुमत परिवर्तनीय असते हे लक्षात ठेवावे. त्यांचे हुकूमशाहीत रुपांतर होणे हा लोकशाहीला धोका आहे असे त्यांचे मत होते.

विरोधासाठी विरोध किंवा विरोधाच्या नावाखाली विध्वंस व अराजक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अमान्य होते. सतत संघर्ष, सारखे स्थगन प्रस्ताव, प्रक्षोभक भाषणे व सभात्याग हे विरोधी पक्षाचे मार्ग लोकशाहीला घातक ठरु शकतात. परस्परांना समजावून घेणे, वैयक्तिक आदान प्रदानातून निष्कर्षाप्रत येणे अशी पथ्ये सत्ताधारी व विरोधक या उभयतांनी पाळणे लोकशाही हिताचे आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. राजकीय पक्षांनी सत्ताधारी तसेच विरोधी यांनी आपल्या जनसामान्यांप्रती आपल्या उत्तरदायित्वाचा कधीच विसर पडू देऊ नये, राजकीय, सामाजिकरणाचे कार्य पक्षांनी करावे. सदैव लोकाभिमुख कार्यासाठी झटावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविले आहे.

**सारांश**

वरील विवेचनावरुन हे सहज लक्षात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीचा चिंतनाचा विषय त्यांची प्रेरणा ही मानवमुक्ती व दीन — दलितांविषयी असिम कळवळयाची होती. त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू मानव होता. त्यांच्या राजकीय लोकशाहीची ओढ सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे होती. आर्थिक, सामाजिक क्षेत्रात न्याय, स्वातंत्र्य, समता, शोषणमुक्ती आणि विषमताचा अभाव आणणे हे त्यांच्या राजकीय लोकशाहीच्या आदर्शाचे परिपूर्ण रुप होते. आज भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोर अनेक प्रश्नचिन्हे उभी आहेत. आज आपल्या देशात जे प्रभावी राजकीय पक्ष आहेत त्यांचे वारसदार स्वत:ला या देशाचे मालक समजून इतरांना गुलाम समजत आहेत. धर्म आणि जातीसमूह यांना राजकारणाचे भांडवल मानून समाजात प्रक्रिया घडवून आणणारे व तिला गतिमान करणारे लोक देशाची एकात्मता खंडित करत आहेत. राजकारणात आत्यंतिक व आंधळया भक्तीभावाचा प्रवेश झाला आहे. राजकीय पक्षांनी त्यांच्या स्वार्थासाठी धर्माचा व जाती समूहाचा वापर सुरु केला आहे. हे सर्व भारतीय लोकशाही व राष्ट्रहिताच्या दृष्टीने हानिकारक व भयंकर आहे. देशहीत जपण्याच्या तसेच लोकशाही मूल्यांची बुज राखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही विचारांची गरज फार मोठी आहे. ते म्हणतात, '' जे काही करु त्यातून लोकशाहीच्या शत्रूंना स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचे उच्चाटन करण्याच्या कामी मदत होता कामा नये.'' आज राजकीय पक्ष देशापेक्षा स्वता:ला मोठे मानत आहेत. धर्मवाद ऊर्फ जमातवाद विरुध्द धर्मनिरपेक्षता व राष्ट्रवाद असा संघर्ष उभा केला जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही विचारांची गरज असल्याची जाणीव होते.

## संदर्भ ग्रंथ

१. डॉ. वा.ना. कुबेर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंथन — केसरी प्रकाशन
२. भगवान दास (संपा) : दस स्पीक आंबेडकर — व्याख्याने — केसरी प्रकाशन
३. आंबेडकर बी. आर : पार्लमेंटरी डेमोक्रॅसी — नवी दिल्ली.
४. जाटवा डी.आर : पॉलिटिकल फिलॉसॉफी ऑफ बी.आर. आंबेडकर — नॅशनल पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली.
५. प्रेम प्रकाश : आंबेडकर पॉलिटिक्स ॲड सेल्युड कास्ट — अशिश पब्लिकेशन — नवी दिल्ली.
६. वसंत मुन : डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग ॲड स्पीच — टवसनउम १ जव ५ — महाराष्ट्र शासन.
७. डॉ. भोळे भा. ल. : आधुनिक भारतातील राजकीय विचार — पिंपळापुरे प्रकाशन.
८. बी.सी. कांबळे — आंबेडकर आणि राज्यघटना (संपादक), सुगावा प्रकाशन.